**-: प्रेसनोट दिनांक - 26/12/2019 :-**

**१. सुभाष रमेश जमने, वय ५२, निमतानदार, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गडहिंग्लज, वर्ग-३, रा. साकेत निवास, त्रिमुर्ती कॉलनी, सांगली व सेक्टर १५, एन एल ६-३, रूम नं. १५, नेरूळ पुर्व, नवी मुंबई, २. भैरू नागाप्पा ढबाने, वय ४४, खाजगी उमेदवार, रा. आजरा रोड, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापू, ३. शंकर गणपती केसरकर, वय ६२, खाजगी उमेदवार, रा. संभाजीनगर, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर...**

---

तक्रारदार श्री. कृष्णात घोरपडे, रा. गडहिंग्लज यांचे वडील शंकरराव घोरपडे यांचे नावे गडहिंग्लज येथील सि.स. नं. २२८९ चे प्रॉपर्टी कार्डप्रमाणे नोंद असले जमिनीवर घर बांधकाम करताना तक्रारदार व त्यांचे वडिलांनी गडहिंग्लज व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. गडहिंग्लज या संस्थेचे एप्रिल २०१५ मध्ये रू. ३०,००,०००/- चे कर्ज घेतले होते. सदर कर्जाचा बोजा हा सि.स.नं. २२८९ चे प्रॉपर्टी कार्डवर नोंद करण्यात आला होता. सदर कर्जाची परतफेड त्यांनी दि. १३/११/२०१९ रोजी केली असुन त्याबाबत पतसंस्थेकडुन त्यांना बोजा कमी करणेसाठीचा ना-हरकत दाखला व विमोचन पत्र देण्यात आले होते. सदरची मालमत्ता तक्रारदार यांचे वडिलांचे नावे असल्याने त्यांनी भुमि अभिलेख कार्यालय, गडहिंग्लज येथे पतसंस्थेचा बोजा कमी करणेबाबत दि. २५/११/२०१९ रोजी रितसर अर्ज दिला आहे. सदर अर्जानुसार प्रॉपर्टी कार्डवरील बोजा कमी होणेबाबतचे कामाचा पाठपुरावा तक्रारदार हे करत होते. गेले महिन्यापासुन सदर कामाची पुर्तता न झालेने तक्रारदार घोरपडे यांनी दि. २३/१२/२०१९ रोजी भुमि अभिलेख कार्यालय, गडहिंग्लज येथे श्री. जमने यांची भेट घेवुन त्यांचे वडीलांचे अर्जाप्रमाणे त्यांचे मालमत्तेच्या प्रॉपर्टी कार्डवरील पंतसंस्थाच्या कर्जाचा बोजा कमी करण्याचे कामाबाबत विचारणा केली. तेव्हा जमने यांनी तेथेच उपस्थित श्री. केसरकर यांना तुमचे कामाबाबत सांगतो, आपण त्यांची भेट घ्या, असे सांगितले. त्यानंतर अर्धा-एक तासाने तक्रारदार यांनी श्री. केसरकर यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना तुमचे वडीलांचे नावे असलेल्या मालमत्तेच्या प्रॉपर्टी कार्डवरील पतसंस्थाचे कर्जाचा बोजा कमी करणेसाठी ३०,०००/- रू. द्यावे लागतील, त्याशिवाय आपले काम होणार नाही. असे जमने साहेबांनी सांगितले आहे, असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना काहीतरी कमी जास्त करा असे म्हटलेवर त्यांनी तडजोड करून रू. ५,५००/- देणेस सांगुन, त्यापेक्षा कमी होणार नाही असे तक्रारदार यांना सांगितले होते. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. २४/१२/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे निमतानदार जमने व खाजगी उमेदवार केसरकर यांच्याविरूध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दि. २६/१२/२०१९ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता प्रथम आरोपी नं. ३ खाजगी उमेदवार केसरकर यांनी आलोसे जमणे व आरोपी नं. २ खाजगी उमेदवार ढबाने यांचेकरीता तक्रारदार घोरपडे यांचेकडुन त्यांचे वडीलांचे नावे असलेल्या मालमत्तेच्या प्रॉपर्टी कार्डमध्ये नोंद असलेला पतसंस्थेचा बोजा कमी करणेसाठी ५,५००/- रू. मागणी केली, तसेच आरोपी नं. २ ढबाने यांनी केसरकर यांचे लाच मागणीस दुजोरा देवुन निमतानदार जमणे यांना लाच देणेस प्रोत्साहन दिले व आलोसे निमतानदार जमणे यांनीही लाच मागणी करून लाच रक्कम सायंकाळी घेवुन येणेस सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे भुमि अभिलेख कार्यालय, गडहिंग्लज येथे सापळा कारवाईचे आयोजन केले असता, निमतानदार श्री. सुभाष जणने यांनी तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करून रू. ५,५००/- लाच स्विकारली व त्यापैकी ५००/- रू. लाच रक्कम आरोपी नं. २ खाजगी उमेदवार भैरू ढबाने यांना दिलेनंतर त्यांना रंगेहाथ पकणेत आले आहे. सदर प्रकरणी निमतानदार सुभाष जमने, खाजगी उमेदवार भैरू ढबाने व शंकर केसरकर यांचेविरूध्द गडहिंग्लज पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा नोदं करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई मा.श्री.राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे, मा. श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर पोलीस हवालदार मनोज खोत, पोलीस कॉन्स्टेबल रूपेश माने व मयुर देसाई सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

**1)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- 1800222021**

**2)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- 020/26122134, 020/26132802, 020/26050423.**

**3)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.,कोल्हापूर मो.नं. 9011228333, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 0231/2540989.**